प्रशा / T 16/ 198/ 2024

वाचले: १. आदेश क्रमांक प्रशा/०६/कावि/४२/२०२२,दिनांक ०७/०१/२०२२
२. आरोग्य वैद्यकीय अधिकारी,वैद्यकीय मुख्य कार्यालय यांचेकडील अहवाल पत्र क्र. वैद्य/१/कावि/७५/२०२४ दिनांक १२/०१/२०२४
३. अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/७९५/२०१७ दिनांक ०१/११/२०१७.
४. अधिकार प्रदान आदेशक्रमांक – प्रशा/२/कावि/७४/२०२१ दिनांक २८/०१/२०२१
५. सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १० /०५/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८
क्र. साप्रवि/६अ/कावि/४/२०२४
दिनांक:१० /०५/२०२४

विषय:. श्री. फापाळे रोहन विनायक सं.क्र.(१३१९३) यांचा
लिपिक पदाचा परिविक्षाधीन कालावधी वाढविणे बाबत......

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. फापाळे रोहन विनायक यांची वाचले क्र.१ चे आदेशान्वये पे लेवल S-6 वेतनश्रेणी र.रु.१९९००-६३२०० या वेतनश्रेणीत लिपिक पदावर रूजू तारखेपासून प्रथमत:१ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता आदेशामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती वर पूर्णत: हंगामी स्वरूपाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री. फापाळे रोहन विनायक हे दिनांक १०/०१/२०२२ रोजी प्रशासन विभागात लिपिक या पदावर रूजू झाले आहेत. त्यांचा परिविक्षाधीन कालावधी दिनांक १०/०१/२०२३ रोजी संपुष्टात आला आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी,वैद्यकीय मुख्य कार्यालय यांनी उपरोक्त वाचले क्र.२ च्या पत्राअन्वये श्री.फापाळे रोहन विनायक यांचा कामकाज अहवाल सादर करण्यात आला असून त्यामध्ये श्री. फापाळे रोहन विनायक यांचे परिविक्षाधीन कालावधीमधील कामकाज समाधानकारक नाही. तसेच नियुक्ती आदेशातील अट क्र.९ नुसार श्री. फापाळे रोहन विनायक यांनी आदेशाचे दिनांकापासून दोन वर्ष कालावधीत टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.मि. व मराठी ३० श.प्र.मि. उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे नियमाप्रमाणे कार्यवाही करणेस स्पष्ट शिफारस केली आहे.

सबब मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपरोक्त वाचले क्रमांक ३ व ४ अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्रस्तूतच्या आदेशान्वये श्री. फापाळे रोहन विनायक, लिपिक यांनी नियुक्ती आदेशातील अट क्र.९ ची पूर्तता केलेली नसल्याने श्री.फापाळे यांचा परिविक्षाधीन कालावधी दोन वर्षा करीता (दि. १०/०१/२०२३ ते ०९/०१/२०२५ अखेर) वाढविणेस मान्यता देत आहे.

प्रस्तूत आदेशाची नोंद श्री. फापाळे रोहन विनायक यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११० १८.

प्रति, श्री.फापाळे रोहन विनायक, लिपिक

प्रत:-१) लेखा विभाग २) लेखा परिक्षण विभाग ३) मागासवर्ग कक्ष
४) सेवाज्येष्ठता कक्ष ५) संगणक कक्ष (सामान्य प्रशासन विभाग)
६) संबधित विभाग---- वैद्यकीय मुख्य कार्यालय